जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ११६ दिनांक - १७/०२/२०२५**

काळेपडळ पोलीस स्टेशन पुणे शहर

## काळेपडळ पोलीसांकडुन दोन गुन्हयातील चोरीस गेलेले सोन्याचे दागिने,मोबाईल, व रोख रक्कम तसेच,मंहिद्रा कंपनीचा ट्रक्टर असा एकुण ३,७८,५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन दोन आरोपीतांना केले अटक

काळेपडळ पोलीस ठाणे कडील गुन्हा रजि.नं.०८/२०२५ भा.न्य.सं.कलम ३०३(२) मधील फिर्यादी वय २९ वर्षे,रा.आंबेगाव बु कात्रज पुणे यांचा ३,५०,०००/-रु.किंमतीचा महींद्र कंपनीचा ट्रॅक्टर चोरीस गेले बाबत अज्ञात इसमा विरुध्द गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयाचे तपासात प्राप्त सीसीटिव्ही फुटेज पाहणी करुन,तांत्रिक तपासा वरुन,तसेच गुप्त बातमीदारा मार्फतीने बातमी मिळाल्या वरुन आरोपी **किरण शामराव पवार वय २७ वर्षे, रा.तरवडे वस्ती महंदवाडी पुणे** यांची ओळख पटवुन,त्यास अटक करुन,त्यांचे कडुन गुन्हयातील चोरीस गेलेला ३,५०,०००/-रु.किंमतीचा मंहिद्र कंपनीचा ट्रॅक्टर जप्त करुन गुन्हा उघडकीस आणण्यात आला आहे.

तसेच काळेपडळ पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं.१३/२०२५ भा.न्य.सं.कलम ३३१(१) ३०५ मधील फिर्यादी वय ४५ वर्षे, रा.ससाणेनगर हडपसर पुणे यांनी त्यांचे घरातील सोन्याचे दागिने,मोबाईल,व रोख रक्कम असा २८,५००/-रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरीस गेलेबाबत अज्ञात इसमा विरुध्द वरील प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयाचे तपासात प्राप्त सीसीटिव्ही फुटेज पाहणी करुन, तांत्रिक तपासा वरुन, गुप्त बातमीदारा मार्फतीने प्राप्त बातमी मिळाल्या वरुन आरोपी **रवि कमल विश्वकर्मा वय २० वर्षे रा. प्रज्वल सोसायटीचे रुममध्ये हांडेवाडी चौक हांडेवाडी पुणे** यास शोध घेवुन,त्यास सदर गुन्हयात अटक करुन,त्यांचे कडुन गुन्हयातील चोरीस गेलेला सोन्याचे दागिने,मोबाईल,रोख रक्कम असा २८,५००/- रु.किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन गुन्हा उघडकीस आणण्यात आला आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ५ श्री.राजकुमार शिंदे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त वानवडी विभाग पुणे,श्री.धन्यकुमार गोडसे, यांचे मागदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,काळेपडळ पोलीस स्टेशन,पुणे शहर,श्री.मानसिंग पाटील,यांचे सुचने प्रमाणे, सहा.पोलीस निरीक्षक,अमित शेटे,पो.अंमलदार दाउद सय्यद,प्रविण काळभोर,काटकर,खोकले,तांबोळी,पंधरकर, शिंदे यांचे पथकाने केली आहे.